# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ६०९ दिनांक २४.०७.२०२०

१. फिर्यादी पुरुष वय-२६ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.विरार पुर्व ता.वसई जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २३/०७/२०२० रोजी सकाळी १२.३० वा.चे सुमारास विरार पश्चिम ता.वसई, जि.पालघर येथे यातील फिर्यादी हे फोनवर बोलत पायी चालत संत नगर मनवेलपाडा ते विजय वल्लभ हॉस्पीटल विरार पश्चिम असे जात असतांना बावा ग्राऊंन्ड हरि मंदीराजवळ आले असता फिर्यादी यांचे पाठिमागुन एक अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे अंगात काळ्या रंगाचा रेनकोट घातलेला अंगाने मध्यम हा फिर्यादी यांचे पाठीमागुन वेगात येवुन फिर्यादी यांचे हातातील मोबाईल जबरीने खेचुन जकातनाका बाजुकडे पळुन गेला म्हणुन विरार पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I ६७७/२०२० भा.द.वि.स.कलम ३९२ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी पुरुष वय २१ वर्षे, धंदा नोकरी, रा.नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २३/०७/२०२० रोजी दुपारी १२:४५ वाजेच्या सुमारास संतोष भुवन भाजी मार्केटचे समोर, पेल्हार-नालासोपारा रोडवर यातील आरोपीत याने त्याचे ताब्यातील ट्रक रोडचे रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व अविचाराने भरधाव वेगात निष्काळजी पणे चालवून घेवुन जात असतांना डावे बाजुने जाणा-या नव्या ॲक्टीवा ६ जी हिला धक्का मारुन अपघात केला. सदर अपघातात स्कुटर चालक हा ट्रकचे चाकाखाली येवुन मयत झाला आहे. तरी ट्रक चालक हा मयत याचे मरणास कारणीभूत होवून जखमीस दवाउपचारकामी न नेता तसेच पोलीस ठाण्यात अपघाताची खबर न देता ट्रक जागीच सोडून पळुन गेला म्हणून तुळींज पोलीस ठाणे गु.रजि.क्र. ६६२/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३०४(अ), २७९, ३३७,३३८ सह मो.वा.का.कलम १८४, १८७, १३४ (अ), (ब) प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पोना/९२२ संदिप मानु भसरा, नेम-तारापुर पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि.२३/०७/२०२० रोजी ०१.०० वाजताचे दरम्यान शांतीनगर येथील श्रीनिवास चायनीज दुकानाच्या शटरच्या आडोशाला यातील अरोपीत, वय- २३ वर्षे, रा.बोईसर, ता.जि-पालघर हा शांतीनगर येथील श्रीनिवास चायनिज दुकानासमोर आडोशाला आपले अस्तित्व लपवित असताना संशयास्पद स्थितीत मिळून आला. म्हणून तारापुर पोलीस ठाणे गु.रजि.क्र. II ३५/२०२० कलम मुंबई पोलीस अधिनियम १२२ (क) प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पुरुष वय ३७ वर्षे, व्यवसाय-नोकरी (पुरवठा निरिक्षक), रा.जव्हार ता.जव्हार,जि.पालघर येथे दि.१५/०७/२०२० रोजी १२.५० वा.यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली की, यातिल आरोपी यांनी त्यांचे रास्तभाव दुकानात शिधापत्रिका धारक यांना नियमानुसार शिधापत्रिके नुसार धान्याचे वाटप न करता कमी करुन धान्य वाटप केल्याबाबतचा कोणताही अभिलेख न ठेवता शिधावाटप धान्याचा काळाबाजार केला म्हणुन जव्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.II १२५ /२०२० अत्यावश्यक वस्तु कायदा कलम १९५५ चे कलम ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

Scanned with CamScanner